# प्रेस नोट

जा.क्र. स्थागुशा/प्रेस नोट/ ८२२ /२०२१
पोलीस अधीक्षक कार्यालय, सिंधुदुर्ग
फॅक्स नं. ०२३६२-२२८२०५
फोन नं. ०२३६२-२२८२०९
दिनांक १०/०२/२०२१

## स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, सिंधुदुर्ग यांचेकडून कुडाळ येथील बोलेरो पिकअप गाडी चोरी व कलमठ येथील घरफोडी चोरीच्या गुन्हयातील आरोपींना शिताफीने अटक केलेबाबत...

---

१) कुडाळ पोलीस ठाणे गु.र.नं. २२४/२०२० भा.दं.वि.क.३७९ हा गुन्हा मुंबई गोवा महामार्गालगत कुडाळ येथील बालाजी मार्बल नजीक दि.१०.११.२०२० रोजी १५.०० वा.ते. दि.१२.११.२०२० रोजी ०९.०० वा.चे मुदतीत घडलेला आहे. सदर गुन्हयातील अज्ञात आरोपीत यांनी महिंद्रा बोलेरो पिकअप नं.एमएच०७/पी-२६११ चोरुन नेलेबाबत गुन्हा दाखल आहे.

सदर गुन्हयातील मुख्य आरोपी इसाक मुजावर याला निष्पन्न करुन गोपनीय बातमीदाराच्या मदतीने दिनांक ०९/०२/२०२१ रोजी रात्रौ ११.०० वाजताचे सुमारास स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी आरोपी इसाक खुदबुद्दीन मुजावर वय ४५ रा.सुभाष नगर, कोल्हापूर याला कोल्हापूर जवाहर नगर येथून शिताफीने अटक करुन पुढील तपासकामी कुडाळ पोलीस ठाण्यात हजर केलेले असून पुढील तपास कुडाळ पोलीस करीत आहेत.

सदरची कारवाई ही मा.पोलीस अधीक्षक श्री. राजेंद्र दाभाडे व पोलीस निरीक्षक स्थागुशा श्री. सुनिल धनावडे यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हा शाखेतील पोलीस उपनिरीक्षक श्री. एस.एम.शेळके, पोह/५७७ ए.ए.गंगावणे, पोना/४५९ पी.एस.कदम, पोकॉ/१२०२ खाडये, पोकॉ/६५५ इंगळे, पोकॉ/२४२ डी.ए.कांदळगांवकर यांनी केलेली आहे.

---

२) कणकवली पोलीस ठाणे गु.र.नं. २६५/२०२० भा.दं.वि.क. ४५४,४५७,३८० हा गुन्हा दि.१०.११.२०२० ते दि.१२.११.२०२० या कालावधीत कलमठ बिडयेवाडी येथे घडलेला आहे. सदर गुन्हयात अज्ञात आरोपीत याने फिर्यादी यांचे राहते घराच्या दरवाजाचा कडी कोयंडा पेचून दरवाजा उघडून आतील लॅपटॉप,मोबाईल हॅन्डसेट व इतर कागदपत्रे असा एकूण ३२००० रु. किंमतीचा माल चोरुन नेलेबाबत गुन्हा दाखल आहे.

सदर गुन्हयातील अज्ञात आरोपीत याचा गोपनीय बातमीदारामार्फत शोध घेण्यात आला. दि.०९.०२.२०२० रोजी गुन्हयामध्ये लालजीभाई बुधभाई सोलंकी वय ३० रा.गुजरात सध्या रा.कलमठ हा निष्पन्न झाल्याने त्याला स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेतील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी शिताफीने अटक केले. आरोपीकडून सदर गुन्हयात चोरीस गेलेल्या मुद्देमालापैकी १२००० रु. किंचा मोबाईल हॅन्डसेट जप्त करण्यात आलेला आहे. कणकवली शहर, कलमठ परिसरात नमूद कालावधीत बरेच चोरीचे गुन्हे घडलेले असून सदरचे गुन्हे उघडकीस येण्याचे दृष्टीने नमूद आरोपीकडे तपास चालू आहे. नमूद गुन्हयातील उर्वरीत मुद्देमाल हस्तगत

करणेकामी आरोपीत याला पुढील तपासकामी कणकवली पोलीस ठाण्यात हजर करण्यात आलेले असून पुढील तपास कणकवली पोलीस करीत आहेत.

सदरची कारवाई ही मा.पोलीस अधीक्षक श्री. राजेंद्र दाभाडे, पोलीस निरीक्षक स्थागुशा श्री. सुनिल धनावडे यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हा शाखेतील पोलीस उपनिरीक्षक श्री. एस.एस.देसाई, सपोफौ/७७४ आर.बी.शेळके, पोकॉ/९७४ सी.एस.नार्वेकर,पोकॉ/१३९ पी.पी.गावडे यांनी केलेली आहे.

(सुनिल धनावडे)
पोलीस निरीक्षक,स्थागुशा,सिंधुदुर्ग

प्रति,

मा. जिल्हा माहीती अधिकारी, सिंधुदुर्ग